तरुण भारत संवाद

बुधवार, १७ एप्रिल २०२४

# इंगळी येथील आरती झाल्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षेत उत्तीर्ण

वार्ताहर
हुपरी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक परीक्षेमध्ये इंगळी (ता. हातकणंगले) येथील आरती जिवंधर कणिरे यांची महाराष्ट्रातील एकूण विद्यार्थिनीमध्ये बाराव्या क्रमांकाने त्या उत्तीर्ण झाल्या. कुटुंबाची आणि नोकरीची जबाबदारी सांभाळून त्यांनी हे यश संपादन केल्याबद्दल ग्रामपंचायत, सर्व संस्था, ग्रुप, संघटना, मंडळे, नातेवाईकांच्यावतीने त्यांची मिरवणूक काढून तिचे जंगी स्वागत करण्यात आले

आरती कणिरेंचे प्राथमिक शिक्षण इंगळीतील कन्या विद्या मंदिर येथे झाले. माध्यमिक शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल इंगळी (श्री. महादेव दादोबा गाताडे विद्यालय इंगळी) येथे झाले. तर बारावीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेज येथे झाले. त्यानंतर लग्न झाले. लग्नानंतर संसाराची जबाबदारी पडल्यामुळे शिक्षणात खंड पडला.

## ग्रामस्थांच्या सहभागाचा अधिक आनंद..



आतापर्यंत कधीही इतके मोठे स्वागत आणि मिरवणूक झाली नाही इतकी मोठी मिरवणूक इंगळीतील माझ्या सर्व भावानी आणि गावातील सर्व जाती धर्मातील लोकांनी एकत्र येऊन काढली. मी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर जितका आनंद झाला नव्हता, त्यापेक्षा जास्त आनंद आता झाला आहे.

–आरती कणिरे

दरम्यान दोन मुले झाल्यानंतर त्यांच्या पालनपोषणात त्या अडकून पडल्यामुळे शिक्षणात आवड असून तिकडे जाता येईना, अशी त्यांची अवस्था झाली. हुशार असूनही आयुष्यात कांही करु शकत नाही, याची खंत नेहमी त्यांना सलत होती. त्यांनी पुन्हा शिवाजी विद्यापीठ येथून २०१८ साली बी.कॉम. त्यानंतर एम. कॉम. फर्स्ट क्लासमध्ये पूर्ण केले. त्यानंतर कमला कॉलेजवर प्राध्यापिका म्हणून रुजू झाल्या. सेटची परीक्षा दिली तीही उत्तीर्ण केली. पीएच.डी.ला त्यांना प्रवेश मिळाला.

त्यानंतर त्यांनी विविध स्पर्धा परीक्षा देण्याचा निर्णय घेत अभ्यास सुरू केला अन् पहिल्याच प्रयत्नात बाजी मारली. इंगळी गावातील त्या प्रथम महिला पोलीस उपनिरीक्षक झाल्या.

इंगळीमध्ये त्यांच्या सर्व बंधूराजानी मिळून गावातून वाजतगाजत मिरवणूक काढायची तयारी केली. पाहतापाहता सर्व गाव मिरवणुकीत सामील झाले. महिलानी साखर, दूध, पाणी देऊन आरती ओवाळून तिचे स्वागत केले. सरपंच दादासो मोरे, उपसरपंच सुमय्या नायकवडे, सर्व सदस्यांसह सहकारी संस्था मंडळांकडून तिचा सत्कार करण्यात आला.

तरुण भारत संवाद
बुधवार
दि. १७ एप्रिल २०२४

# युपीएससी परीक्षेत कोल्हापूरचे लखख यश!

## आशिष पाटील, फरहान जमादार, वृषाली कांबळे, प्रांजल नवले यांनी फडकविला झेंडा



आशिष पाटील
शाहूवाडी साळशी
रँक : १४७



फरहान जमादार
कोल्हापूर
रँक : १९१



वृषाली कांबळे
उत्तूर
रँक : ३१०



प्रांजल नवले
वाळवा, इचलकरंजी
रँक : ८७५

टीम तरुण भारत संवाद

कोल्हापूर, शाहूवाडी, उत्तूर, इचलकरंजी केंद्रीय लोकसेवा आयोगाने (युपीएससी) २०२३ मध्ये घेतलेल्या परीक्षेचा निकाल मंगळवारी जाहीर झाला. यामध्ये कोल्हापूरच्या चार विद्यार्थ्यांनी लखख यश संपादन केले. शाहूवाडी तालुक्यातील साळशी गावच्या आशिष पाटीलने देशांत १४७ वी रँक मिळवत थेट जिल्हाधिकारीपदाला गवसणी घातली. कोल्हापूर शहरातील ताराबाई पार्कातील फरहान जमादार यानेे १९१ वी रँक प्राप्त केली. आजरा तालुक्यातील उत्तूर गावची २३ वर्षीय सुकन्या वृषाली संतराम कांबळेने तर चक्क पहिल्याच प्रयत्नात ३१० वी रँक मिळवत आपल्या आई–वडिलांचे स्वप्न सत्यात उतरविले. मूळची सांगली जिल्ह्यातील वाळवा गावच्या पण इचलकरंजीत शिक्षण घेतलेल्या प्रांजल नवले हिने देशात ८७५ वी रँक मिळवून आपल्या पालकांचा आणि गुरूजनांचा विश्वास सार्थ ठरविला. विशेष म्हणजे सर्व रँकर विद्यार्थी हे सर्वसामान्य शेतकरी आणि मध्यमवर्गातील आहेत.

### आशिष पाटील यांचे तिसऱ्या प्रयत्नात यश

युपीएससीच्या परीक्षेत देशात १४७ वी रँक मिळवत थेट जिल्हाधिकारीपदी विराजमान होण्याची संधी लाभलेला आशिष पाटील हा शाहूवाडी तालुक्यातील साळशी गावाचा. आयएएस होण्याचे स्वप्न बाळगून अभ्यास करणाऱ्या आशिषने शेतकऱ्याचे पोर जिल्हाधिकारी होऊ शकते, हे सिद्ध केले. गेल्या डिसेंबर महिन्यात त्याने एक वर्षाचे सेवेत एक्सटेन्शनचा पर्याय निवडून

पान ८ पहा

# युपीएससी परीक्षेत कोल्हापूरचे लखख यश!

पान १ वरून

युपीएससीची तयारी कायम ठेवली. अनुभव गाठीशी होताच. फक्त याआधीच्या लहान–सहान चुका कटाक्षाने टाळणे आणि स्पर्धा परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जाण्याची इच्छाशक्ती ठेवली. साहजिकच पूर्व परीक्षा (जून २०२३) पाठोपाठ मुख्य परीक्षा (सप्टेंबर २०२३) आणि मुलाखत (१९ मार्च २०२४) असे प्रमुख टप्पे पादाक्रांत करून रँकमध्ये अपेक्षित सुधारणा करण्यात त्यांना यश मिळाले. १४७ अशी रँक मिळाल्यामुळे थेट जिल्हाधिकारी पदावर रुजू होण्याची संधी मिळाली आहे. आशिष यांनी मराठी माध्यमातून ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिक्षण घेतले. इंग्रजी भाषेची निवड करून युपीएससी परीक्षेला सामोरे जात त्याने एकदा नव्हे तर दोनदा यशाचा झेंडा फडकावला आहे. आई–वडिलांचे संस्कार आणि गुरुजनांनी दाखविलेला मार्ग हेच आपल्या यशाचे गमक असल्याचे आशिष पाटीलने सांगितले.

### वाळव्याच्या शेतकऱ्याच्या लेकीची बाजी

सांगली जिल्ह्यातील वाळवा गावचे शेतकरी प्रमोद नवले यांची कन्या असशणाऱ्या प्रांजलीने इचलकरंजीतील वीराचार्य बाबासाहेब कुचनुरे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व निवासी केंद्रातील अभ्यास करून संपूर्ण भारतातून ८७५ वी रँक मिळवली. शेतकऱ्यांच्या लेकीच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिचे प्राथमिक शिक्षण जिजामाता विद्यालय तर हुतात्मा किसन अहिर ज्युनिअर कॉलेज वाळवा या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षण झाले. विज्ञान शाखेनंतर तिला राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठात बी टेक साठी प्रवेश मिळाला. त्यानंतर तिने स्पर्धा परीक्षा देण्याचा निर्णय घेतला सुरुवातीपासूनच प्रांजली ही विराचार्य अकॅडमीच्या निवासी केंद्रात राहत होती. याच ठिकाणी तिने अत्यंत जिद्दीने व मेहनत घेऊन अभ्यास केला.

### फरहान जमादार यांनी १९१ रँक मिळवली

कोल्हापुरातील ताराबाई पार्क येथील फरहान जमादारने १९१ वा रँक मिळवत उज्वल यश मिळवले. तिसऱ्या प्रयत्नात त्याला मिळाले फरहानचे प्राथमिक, माध्यमिक शिक्षण कदमवाडी येथील सुसंस्कार हायस्कूल येथे झाले. विवेकानंद कॉलेजमध्ये बारावी तर सांगलीतील वालचंद कॉलेजमधून कॉम्प्युटर सायन्समधून इंजिनिअरिंगची पदवी घेतली. त्याचे वडील खासगी प्रिंटींग प्रेसमध्ये काम करतात. तर आई गृहिणी आहे. त्याला शिक्षकांचे मार्गदर्शन आणि आई–वडील आणि मित्रांचे सहकार्य लाभले. युपीएससीचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांनी, प्रयत्न, चिकाटी आणि अभ्यासात सातत्य ठेवले पाहिजे. अपयशाला न घाबरता प्रयत्न केले पाहिजेत, असे मत फरहानने व्यक्त केले.

### उत्तुरच्या वृषाली कांबळे यांनी मिळवले पहिल्याच प्रयत्नात यश

आजरा तालुक्यातील उत्तूर येथील वृषाली संतराम कांबळे हिने देशभरात ३१० वी रॅन्क घेऊन युपीएससी परिक्षेत उज्वल यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे वयाच्या २३ व्या वर्षी व पहिल्याच प्रयत्नात तयांनी यश संपादन केले आहे. वृषाली यांनी पॉलिटिकल सायन्स घेऊन बी. ए. पूर्ण केले आहे. मुंबई येथील सेंट झेविअर्स कॉलेज येथे त्यांचे शिक्षण झाले आहे. वृषालीचे मूळ गाव उत्तूर असून त्यांचे वडिल कामानिमित्त नेरूर येथे राहतात. तेथेच त्यांचे शिक्षण झाले.